आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१७ नोव्हेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात, येत्या बुधवारी मतदान

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नायजेरियामधे हृद्य स्वागत/ राष्ट्रप्रमुखांशी चर्चा केल्यावर स्वीकारणार नायजेरियाचा सर्वोच्च सन्मान

- देशाच्या पहिल्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

- इफ्फी, चित्रपट महोत्सवाच्या आंतरराष्ट्रीय परीक्षक पटलाचे अध्यक्ष म्हणून दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती

**आणि**

- महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारताचा सामना आज जपान बरोबर

**<><><><><>**

राज्यात विधानसभेच्या निवडणुकीसाठी प्रचार संपायला आता, आज आणि उद्या असे दोनच दिवस शिल्लक राहीले आहेत. आज रविवार असल्यानं सर्व राजकीय पक्षांचे उमेदवार अधिक जोमाने प्रचार करत आहेत.

येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान असून एकूण ४ हजार १३६ उमेदवारांचं भवितव्य ठरणार आहे. यावेळी निवडणूक रिंगणात ३६३ महिला उमेदवार आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ नोव्हेंबर २०२४ - रविवार

केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नागपूर इथं वार्ताहर परिषद घेतली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाविजय होईल, असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी यावेळी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकारने राज्यात जी विकासकामं केली आहेत, त्यामुळे राज्यातला मतदार नक्कीच महायुतीच्या बाजूने उभा राहील, असा विश्वासही चौहान यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात रोड-शो केला. त्यानंतर ते आज दुपारी चांदवड आणि संध्याकाळी कोल्हापुरात इचलकरंजी इथं जाहीर सभा घेणार आहेत.

महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा आज मुंबई इथे होणार आहे. या सभेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. भाजपाचे तीन केंद्रीय मंत्री आणि गुजरातच्या मुख्यमंत्र्यासह अनेक वरिष्ठ नेते प्रचारासाठी मुंबईत दाखल झाले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे मुंबईत भांडूप इथे जाहीर सभा घेणार आहेत.

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उत्तर प्रदेशाच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांची आज दुपारी पुण्यात प्रचार सभा होणार आहे.

**<><><><><>**

एमआयएमच्या असदुद्दीन ओवेसी यांची काल मालेगाव इथं सभा झाली. या सभेत त्यांनी केंद्र सरकार वक्फ बोर्डाकडे असलेली मालमत्ता कायद्याच्या माध्यमातून ताब्यात घेण्याच्या तयारीत असल्याचा आरोप केला.

राज्यसरकारच्या सदोष धोरणामुळे नाशिकमधले पाचशे उद्योग बंद पडल्याचा आरोप मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नाशिकमध्ये झालेल्या सभेत केला.

**<><><><><>**

भाजपा जे बोलतो तेच करून दाखवतो. महाराष्ट्रातही महायुतीच्या सरकारने चांगलं काम केलं असून लाखो महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग काल वसई इथल्या जाहीर सभेत म्हणाले. वसई विधानसभा मतदारसंघाच्या भाजपाच्या उमेदवार स्नेहा दुबे पंडित यांच्या प्रचारार्थ या सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. भाजपा चांगलं काम करत असूनही राहुल गांधी हे खोटं बोलून जनतेची दिशाभूल करत आहेत, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

पंडित जवाहरलाल नेहरू आणि बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या नेत्यांनी लोकशाहीच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य वेचलं. पण, भारतीय जनता पार्टीने मात्र देशात फूट पाडण्याचं काम केलं अशी टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज केली. नागपूरजवळ उमरेड इथे प्रचारसभेत ते बोलत होते. राज्यात आता मतदारांना सरकार बदलायचं आहे आणि हे खोटं सरकार पाडायचं आहे, असं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

**<><><><><>**

महायुतीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले उद्योग गुजरातमध्ये नेण्यात आले, यामुळे राज्यातली दहा लाख कोटींची गुंतवणूक बाहेर गेली, आठ लाख नोकऱ्या गेल्या, आणि ६ हजारपेक्षा जास्त कंपन्या बंद पडल्या, असा आरोप काँग्रेस महासचिव प्रियांका गांधी यांनी केला. त्या आज गडचिरोली इथं प्रचारसभेत बोलत होत्या. स्वातंत्र्यानंतर देशभरात मोठमोठे उद्योग, संस्था, निर्माण झाल्या. कोणत्याही सरकारने जनतेसोबत भेदभाव केला नाही. मात्र महायुती आणि भाजपाचं सरकार जनतेसोबत भेदभाव करतं, अशी टीका गांधी यांनी केली.

**<><><><><>**

मतदानाबद्ल मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी पालघरमध्ये आज ‘रन फॉर वोट’चं आयोजन करण्यात आलं होतं. स्वीप उपक्रमांतर्गत केलेल्या या तीन आणि पाच किलोमीटर मॅरेथॉनमध्ये पालघर जिल्ह्यातले शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थी, विविध कार्यालयीन कर्मचारी तसंच अधिकारी, भारत स्काऊट गाईड, राष्ट्रीय छात्र सेना यांचे विद्यार्थी तसंच शिक्षकांनी भाग घेतला.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावं याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानं परभणी शहरात आज सायकल रॅली काढण्यात आली.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **सांगली** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

तीन देशांच्या दौऱ्यामधे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नायजेरियामधे पोहचले असून तिथल्या भारतीय समुदायाने त्यांचं जल्लोषात स्वागत केलं. मोदी यांनी भारतीय समुदायाशी संवाद साधला. नायजेरियात राहणाऱ्या मराठी भाषक समुदायानं आपल्या मुळांशी आणि मातीशी नातं जपलं असल्याबद्दल मोदी यांनी या समुदायाचं कौतुक केलं. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी समुदायाने आनंद व्यक्त केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद तिनुबू यांच्याशी ते आज चर्चा करतील. या बैठकीत दोन्ही देशांदरम्यानच्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेण्यात येईल आणि द्विपक्षीय संबंध वाढवण्याबाबत चर्चा होईल. या

चर्चेनंतर अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची अपेक्षा आहे. ‘दि ग्रँड कमांडर ऑफ ऑर्डर ऑफ दि नायजर’ हा नायजेरियातला सर्वोच्च सन्मान प्रधानमंत्री मोदी यांना प्रदान करण्यात येणार आहे. इतर देशांकडून मोदी यांना मिळणारा हा १७वा सन्मान आहे. नायजेरियानंतर प्रधानमंत्री ब्राझिल आणि गयाना देशांना भेट देणार आहेत.

G ट्वेंटी शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी उद्या ते दोन दिवसांच्या ब्राझीलच्या दौऱ्यावर असतील तर तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात ते गयानाला जातील.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या विकासात अग्रणी भूमिका निभावली असून मराठी माणसाला सक्षम बनवलं, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

देशाच्या पहिल्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची चाचणी संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं यशस्वी केली आहे. ओदिशापासून जवळ डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरुन हे क्षेपणास्त्र काल डागण्यात आलं. विविध प्रकारच्या स्फोटकांचा मारा सुमारे दीड हजार किलोमीटर अंतरापर्यंत या क्षेपणास्त्रातून करता येतो. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी याबद्दल डीआरडीओ आणि सामुग्री उत्पादक कंपनीचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><>**

इफ्फी म्हणजेच भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ साठी आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा महोत्सव २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात आयोजित करण्यात आला आहे. आशुतोष गोवारीकर यांनी या नियुक्तीबाबत आनंद व्यक्त केला असून

काळानुसार विकसित होणारा सिनेमा पाहण्यासाठी या महोत्सवापेक्षा दुसरी चांगली संधी नाही असं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारताचा सामना आज जपान बरोबर होणार आहे. भारतीय महिला खेळाडूंनी आशयाई चॅम्पियन्स ट्रॉफी मध्ये विजयाची घोडदौड सुरू ठेवत चीन ला ३-० नं हरवून सलग चौथ्या वेळी विजय प्राप्त केला आहे. जपाननं मलेशियाला २-१ असं हरवलं.

बिहारमधे राजगीर इथं संध्याकाळी पावणेपाच वाजता हा सामना सुरू होईल.

**//<><><><><>//**